
साप्ताहिक
# पुणेरी चळवळ
संपादक : सुनिल बालकिसन गोयल
मो. ९८६३६४६४६४
■ RNI No: MAHMAR/2020/87539
www.punerichalval.co.in

■ वर्षे ६ ■ अंक २० ■ पुणे, गुरुवार १४ मे २०२६ ते २० मे २०२६ ■ मुल्य : २ रु ■ पान ४

■ Volum 6 ■ Issue : 20 ■ Pune, Thursday, 14 May 2026 to 20 May 2026 ■ Price : 2 Rs/- ■ Pages : 4

# परवानगी खिशात अन् हातोडा हातात, घोलप मॅडमचा रुबाब फक्त गरिबाच्याच ताटात!





RI 14 A104
02/03/2026
पुणे महानगरपालिका
चलन / पावती
68105
खात्याचे नाव येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रिय कार्यालय
मालकाचे नाव श्री. बालेश्वरदास बबुराम
पत्ता स.न.-११३/९, बनारसी चाळ विश्रांतवाडी पुणे-१५.
कामाचा तपशील : रक्कम ₹
झोपडी दुरुस्ती / तात्पुरती डागडुजी
परवानगी फी = २५=००
एकूण ₹ २५=००
एकूण रक्कम ₹ रु. पंचवीस फक्त
वसाहत अधिकारी झो.नि.पु.
खातेप्रमुख,
येरवडा क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका
वरीलप्रमाणे रोख / चेक / मनिऑर्डरने मिळाले.
बँक ऑफ महाराष्ट्र पुणे म.न.पा. शाखा, पुणे-5
Bank of Maharashtra, Pune P.M.C. Br. Pune-5
MAR 2026
नगद प्राप्त
CASH RECEIVED
पैसे मिळाल्याचा बँकेचा शिक्का
सही :
दिनांक :

पुणे प्रतिनिधी :-
**पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात सध्या कायद्याचं नाही, तर फक्त मॅडम च्या शब्दाचं राज्य चालतंय की काय, असा संतापजनक प्रश्न विश्रांतवाडीत उभा राहिला आहे . कनिष्ठ अभियंता कामिनी घोलप यांनी विश्रांतवाडीतील सर्वे नंबर ११३/९ बनारसी चाळ परिसरात जो धिंगाणा घातलाय तो बघून प्रशासन चाललंय की वसुली केंद्र? असा सवाल विचारला जातोय.**

हातात कायदेशीर कागदपत्रं नसतानाही केवळ अहंकाराचा आणि वरच्या इशाऱ्याचा बडगा दाखवत एका सामान्य नागरिकाच्या पोटावर पाय देण्याचं पाप या मॅडम नी केलं असून या संपूर्ण प्रकरणाच्या त्या मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप आता होऊ लागला आहे.

मिळकतधारकाकडे महापालिकेच्या गवनी विभागाची रीतसर दुरुस्तीची परवानगी रितसर घेतली होती.गवनिचा टॅक्स भरल्याच्या पावत्या होत्या. तसेच ग,व,नि खात्याने बांधकाम विभागाकडे परवानगी बाबत काही पत्रव्यवहार केलेले होते. पण कामिनी घोलप यांना कदाचित सरकारी कागदापेक्षा दुसऱ्याच गोष्टींची ओढ जास्त असावी.

आमच्याकडे परवानगी आहे, ही पहा कागदपत्रं असं ओरडून सांगूनही या मॅडमचा इंगा काही कमी झाला नाही.

नियमानुसार कारवाईपूर्वी ५३ किंवा ५४ अंतर्गत नोटीस देणं बंधनकारक असताना मॅडमने नोटीस काय आपल्या खिशात ठेवली होती का? असा प्रश्न उपस्थित होतोय.

**पुणे महानगरपालिकेच्या दोन खात्यांमधील गोंधळाचा फटका नागरिकाला**

विनानोटीस आणि विनापरवाना हातोडा चालवून त्यांनी कायद्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत.

विश्रांतवाडीत आणि आसपास अनधिकृत बांधकामांचे डोंगर उभे आहेत टोलेजंग इमारती बिनबोभाट उभ्या राहतात, तिकडं या मॅडमना नेमका मोतिबिंदू होतो हे सर्वांनाच ठाऊक आहे.

मग याच मिळकतीवर विनानोटीस धावून जाण्याचं कंत्राट नक्की कोणी दिलं होतं? या एका तोडफोडीच्या बदल्यात घोलप मॅडमच्या झोळीत किती वजन पडलं आणि कोणाची सुपारी त्यांनी वाजवली याची चर्चा आता पानटपरीपासून ते महा नगर पालिकेच्या गल्लीबोळात रंगली आहे.

स्वतःचा खिसा गरम करण्यासाठी आणि राजकीय नेत्यांना खुश करण्यासाठी एका नागरिकाचं आयुष्य उद्ध्वस्त करण्याचा हा अर्थपूर्ण प्रकार अत्यंत संतापजनक आहे.

कारवाईवेळी जेव्हा मिळकत धारकांनी लेखी आदेश मागितले तेव्हा मॅडमच्या अंगात जणू लेडी सिंघम च संचारली होती. तुम्ही कोण विचारणारे? सरकारी कामात अडथळा आणला तर आत टाकेन, अशी धमकी त्यांनी दिली. सरकारी खुर्चीवर बसून जनतेचे सेवक होण्याऐवजी मालक बनू पाहणाऱ्या या घोलप मॅडमनी हे विसरू नये की, त्यांचा पगार जनतेच्या टॅक्स व घामाच्या पैशातून निघतो.

**भाकरी खावयाची पालिकेची अन चाकरी करावयाची राजकीयची?**


अधिकाराचा माज आणि खाकीचा धाक दाखवून जर त्या सामान्य माणसाला लुटणार असतील, तर अशा भ्रष्ट अधिकाऱ्याची जागा खुर्चीत नाही तर विभागीय चौकशीच्या फेऱ्यात असायला हवी.

आता हिशोब तर होणारच केवळ तक्रार करून नागरिक थांबणार नाहीत. आपल्या पदाचा गैरवापर करून आर्थिक नुकसानीचा डोंगर उभा करणाऱ्या कामिनी घोलप यांनी आपली ही भयानक चूक मान्य करावी आणि झालेल्या नुकसानीची पाई अन पाई भरून द्यावी, हीच मागणी आता जोर धरतेय.

पोलीस आयुक्त आणि महा नगरपालिका आयुक्तांकडे या मुख्य सूत्रधारा विरुद्ध फौजदारी गुन्ह्याची तक्रार करण्यात आली आहे. आयुक्तांनी अशा मग्रूर व गैरवर्तन करणा-या अधिकाऱ्याला वेळीच लगाम घातला नाही तर विश्रांतवाडीची व सामान्य जनता महापालिकेच्या पायऱ्या उतरू देणार नाही. असा चर्चा स्थानिकांनी चालू असल्याची शक्यता नाकरता येणार नाही.

अशा मग्रूर अधिकाऱ्यावर पालिका आयुक्त काय कारवाई करणार? मिळकत धारकाला नुकसान भरपाई मिळणार का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील का?




एक खिडकी योजना
आवक क्रमांक :- E 4318784
आवक दिनांक :- 30/4/2026
स्वागत कक्ष अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

प्रति,
मा.पोलीस आयुक्त साहेब
पोलीस आयुक्तालय ,पुणे स्टेशन पुणे 411001

विषय: परवानगीशिवाय खाजगी मालमत्तेत बेकायदेशीर प्रवेश करून तोडफोड केल्याप्रकरणी कनिष्ठ अभियंता कामिनी घोलप व संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत.

अर्जदार: वरुण सुनिल गोयल,
रा: सं.नं.113/9, बनारशी चाळ ,विश्रांतवाडी, पुणे.411015
फोन नं.9863646464

महोदय,

मी, वरुण गोयल, वरील पत्त्यावर राहणारा असून या पत्राद्वारे खालीलप्रमाणे तक्रार नोंदवत आहे:

१. विश्रांतवाडी येथील सं.नं.113/9, बनारशी चाळ ,विश्रांतवाडी, पुणे.411015 या ठिकाणी माझी मालकीची वास्तू आहे. सदर वास्तूचे सर्व कायदेशीर दस्तऐवज माझ्याकडे उपलब्ध आहेत.

२. दि.28/04/2026 रोजी सकाळी 11ते 1.30 या वेळात, पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता **कामिनी घोलप** व त्यांच्यासोबत आलेल्या इतर कर्मचाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना किंवा कायदेशीर नोटीस न देता माझ्या मालमत्तेत बेकायदेशीरपणे प्रवेश केला.

३. सदर अधिकाऱ्यांनी सत्तेचा दुरुपयोग करून माझ्या वास्तूमध्ये तोडफोड केली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम (MRTP Act) मधील तरतुदींनुसार कोणतीही नोटीस न देता केलेली ही कारवाई पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

४. या कृत्यामुळे माझे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून, जनसामान्यांमध्ये माझी सामाजिक प्रतिष्ठा मलिन झाली आहे. या सर्व प्रकारामुळे मला प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

५. कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब न करता, खाजगी जागेत घुसून मालमत्तेचे नुकसान करणे हा फौजदारी गुन्हा आहे. तरी प्रशासकीय नियमांचे उल्लंघन करून, अधिकारांचा गैरवापर करणाऱ्या **कनिष्ठ अभियंता कामिनी घोलप** व त्यांच्या सहकाऱ्यांवर भारतीय दंड संहिता (IPC) कलम ४४७, ४४८, ४२७ व १६६ अन्वये त्वरित गुन्हा दाखल करावा आणि त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी.

तसेच, झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून मला योग्य तो न्याय मिळवून द्यावा, ही नम्र विनंती.

1) तोडफोडीचे फोटो/व्हिडिओ फुटेज.
2) मालमत्तेची कागदपत्रे.

आपला नम्र,
वरुण सुनिल गोयल

शहर अभियंता कार्यालय
बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका

(प्रत माहितीसाठी: 1. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका
2. मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक महोदय, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे.411015
③ शहर अभियंता कार्यालय शिवाजीनगर पुणे-०५

पुणे महानगरपालिका
महापालिका आयुक्त कार्यालय
शिवाजीनगर,पुणे-४११००५
लेखनिक
स्वागतकक्ष

ठाणे अंमलदार
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे
ता. ३०/०४/२०२६

# संपादकीय

## 'नीट'ची नामुष्की

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नीट-यूजीची परीक्षा घेणारी नॅशनल टेस्टिंग एजन्सी पुन्हा एकदा नापास झाली. यंदाच्या परीक्षेचा पेपर फुटल्याच्या अहवालानंतर ३ मे रोजी घेण्यात आलेली नीट-यूजी २०२६ ची परीक्षा मंगळवारी रद्द करण्यात आली. त्यामुळे देशभरातील लाखो वैद्यकीय प्रवेशेच्छुक विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांची चिंता वाढली असून त्यावरून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांच्या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी ही परीक्षा आता नव्याने घेतली जाणार आहे. या परीक्षेच्या नवीन तारखा लवकरच जाहीर केल्या जाणार आहेत. एनटीएने 'एक्स'वर प्रसिध्द केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रीय परीक्षा प्रणालीवरील विश्वास कायम राखण्यासाठी आणि पारदर्शकता जपण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. तपास यंत्रणांनी दिलेल्या माहितीच्या आधारे सरकारने ३ मे २०२६ रोजी झालेली परीक्षा रद्द करून ती पुन्हा घेण्याचा निर्णय घेतला आहे. एनटीएने ३ मे रोजी ही परीक्षा भारतातील ५५१ शहरांमध्ये आणि परदेशातील १४ शहरांमध्ये घेतली होती. सुमारे २३ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. पेपरफुटी आणि इतर अनियमिततांच्या आरोपांची चौकशी आता सीबीआयकडे सोपविण्यात आली असून एनटीए या तपासात पूर्ण सहकार्य करणार आहे. राजस्थान पोलिसांच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुपने (एसओजी) 'गेस पेपर' या प्रकरणाचा प्राथमिक तपास केला आहे. परीक्षेपूर्वी सुमारे ४१० प्रश्नांचा एक 'गेस पेपर' विद्यार्थ्यांमध्ये फिरत होता असा दावा केला जात आहे की, यातील सुमारे १२० प्रश्न केमिस्ट्रिशी संबंधित होते. हा पेपर परीक्षेच्या १५ ते ३० दिवस आधीच उपलब्ध झाला होता, ज्याची आता सखोल चौकशी केली जात आहे. बिहारमध्ये नीट परीक्षेत सॉल्वर टोळी सक्रिय होती आणि ६० लाख रुपयांमध्ये एका जागेचा सौदा झाला होता. परीक्षेच्या आधी पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा खुलासा केला होता. याचा सूत्रधार एक एमबीबीएसचा विद्यार्थी होता. नालंदा पोलिसांनी टोळीतील ७ जणांना अटक केली होती. पोलिसांच्या तपासात असे आढळले की ही टोळी नीट परीक्षा पास करून देण्यासाठी एका उमेदवाराकडून ५० ते ६० लाख रुपयांपर्यंत वसूल करणार होती. यापैकी १.५ ते २ लाख रुपये आगाऊ म्हणून घेतले जात होते. यानंतर परीक्षा केंद्रावर मूळ उमेदवाराऐवजी सॉल्वर बसवण्याची तयारी केली जात होती. मास्टरमाईंडने दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी औरंगाबाद, जमुई आणि मुजफ्फरपूरसह विविध जिल्ह्यांमध्ये छापे टाकून आणखी ४ आरोपींना अटक केली होती. मुख्य आरोपीला अटक झाल्यामुळे संपूर्ण टोळीच्या मनसुब्यांवर पाणी पेरले गेले. नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील संशयित आरोपीला नाशिक क्राईम ब्रँच युनिट २ ने ताब्यात घेतले आहे. राजस्थानचे तपास पथक आल्यानंतर संशयिताला त्यांच्या ताब्यात देण्यात येणार आहे. राजस्थान पोलिसांनी देशभरातून १६ संशयितांना ताब्यात घेतले आहे. नाशिक पोलिसांनी बीएएमएसच्या शेवटच्या वर्षात शिकत असलेल्या ३० वर्षीय विद्यार्थ्याला ताब्यात घेतले आहे. संशयित मूळचा नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथील रहिवासी आहे. त्याने डोक्याचा चमनगोटा करून वेश बदलला होता. नीट परीक्षा रद्द करण्यात आल्याच्या निषेधार्थ दिल्लीत मंगळवारी एनएसयूआयतर्फे शास्त्री भवनाबाहेर तीव्र निदर्शने करण्यात आली. या वेळी आंदोलकांच्या हातात 'पंतप्रधान तडजोड करतात, पेपरमध्येही तडजोड होते', 'पेपरमध्ये लीक, मोदी सरकार वीक' आणि 'डॉक्टरची पदवी विक्रीला आहे' अशा आशयाचे फलक होते. आंदोलक 'विद्यार्थ्यांवरील अत्याचार थांबवा' अशा घोषणा देत होते. नीटचा पेपर फुटल्याच्या आरोपांची जबाबदारी स्वीकारत एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंग यांनी या परीक्षेच्या फेरपरीक्षेचे वेळापत्रक पुढील ७ ते १० दिवसांत जाहीर केले जाईल, असे घोषित केले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष आणि वैद्यकीय महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया विस्कळीत होऊ नये या दृष्टीने पुढील प्रक्रियेला सुरुवात केली जाणार आहे. फेरपरीक्षा अत्यंत कमी कालावधीत घेऊन निकाल लावण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षेसाठी पुन्हा अर्ज करण्याची गरज नाही. जुनाच डेटा वापरला जाईल, नोंदणी तपशील आणि उमेदवारी तशीच पुढे नेली जाईल. पूर्वी निवडलेली परीक्षा केंद्रे वैध राहतील, कोणतेही अतिरिक्त परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही. नवीन परीक्षेपूर्वी नवीन प्रवेशपत्रे जारी केली जातील. नीट-यूजी २०२६ परीक्षा रद्द झाल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर अत्यंत तिखट शब्दांत टीका केली आहे. पंतप्रधान मोदींचा तथाकथित 'अमृतकाळ' देशासाठी आता 'विष काळ'बनला आहे, असा हल्ला त्यांनी केला. एक्सवरील पोस्टमध्ये ते म्हणतात, परीक्षा रद्द करून भ्रष्ट भाजप सरकारने २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे कष्ट, त्याग आणि स्वप्ने चिरडून टाकली आहेत. कोणाच्या वडिलांनी कर्ज काढले होते, तर कोणाच्या आईने आपले दागिने विकले होते. लाखो मुलांनी रात्रभर जागून अभ्यास केला, मात्र त्या बदल्यात त्यांना काय मिळाले तर पेपरफुटी, सरकारी निष्काळजीपणा आणि शिक्षणातील संघटित भ्रष्टाचार! ही केवळ सरकारची अकार्यक्षमता नसून तरुणांच्या भविष्याविरोधात केलेला एक मोठा गुन्हा आहे. प्रत्येक वेळी पेपर माफिया मोकाट सुटतात आणि त्याची शिक्षा प्रामाणिक विद्यार्थ्यांना भोगावी लागते. जर एखाद्याचे नशीब मेहनतीवरून नाही तर पैसा आणि ओळखीवरून ठरत असेल तर शिक्षणाला काय अर्थ उरतो? पेपरफुटी प्रकरणात नाशिकचा संशयित शुभम खैरनारने १० लाख रुपयांना ही प्रश्नपत्रिका विकत घेतली होती आणि पुढे ती १५ लाख रुपयांना विकल्याचा संशय आहे. नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची पहिली प्रत नाशिकमध्ये फुटली आणि तिथून ती हरियाणात पोहोचली. हरियाणात या प्रश्नपत्रिकेची १० वेगवेगळे संच तयार करण्यात आले आणि त्यानंतर ही साखळी बिहार, आंध्र प्रदेश आणि जम्मू-काश्मीरपर्यंत पसरली. राजस्थानचा 'मनीष' हा या संपूर्ण कटाचा मुख्य सूत्रधार मानला जात आहे. वर्षभर कठोर मेहनत करून परीक्षा दिल्यानंतर अचानक ती रद्द झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना मानसिक तणावाचा सामना करावा लागत आहे. काही विद्यार्थी परीक्षा झाल्यानंतर आपल्या गावी परतले आहेत तर काही सुटीसाठी बाहेरगावी गेले आहेत. फेरपरीक्षेच्या अनिश्चिततेमुळे पुढील नियोजनाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. ज्यांनी अत्यंत जिद्दीने आणि प्रामाणिकपणे नीट परीक्षेची तयारी केली त्यांच्या भवितव्याशी खेळ केला गेला आहे. या प्रकरणातील दोषींविरुध्द कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे. कटात सहभागी प्रत्येकाला कडक शिक्षा मिळाली पाहिजे. या प्रकरणात सरकार आणि प्रशासनातील काही व्यक्तींचा सहभाग असू शकतो. गत आठ वर्षांत १६ वेळा परीक्षा रद्द किंवा पुढे ढकलाव्या लागल्या आहेत, ही अतिशय गंभीर बाब आहे. पेपरफुटी प्रकरणाने मोदी सरकारच्या भोंगळ कारभाराच्या चिंधड्या उडवल्या आहेत.

# अपयशाचा पुरावा!

पश्चिम आशियातील संघर्षामुळे उद्भवलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी नागरिकांनी काटकसरीचे उपाय योजावेत, असे आवाहन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्षभर सोने खरेदी न करण्याबाबतचे वक्तव्य केले होते. त्यावर देशभरातून तीव्र पडसाद उमटले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधानांचे विधान म्हणजे त्यांच्या अपयशाचा पुरावा असल्याचे म्हटले आहे. काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी सोमवारी मोदींवर जोरदार टीका करताना 'तडजोड केलेले पंतप्रधान आता देश चालवण्यास सक्षम राहिलेले नाहीत', असे म्हणत सरकारवर जोरदार निशाणा साधला. सोन्याशी संबंधित सुमारे तीन कोटी कामगारांचे काय होणार, असा सवाल सराफा बाजाराने उपस्थित केला. मोदी यांनी वर्षभर सोने खरेदी करू नका, असे आवाहन केले आहे. या आवाहनाला सराफा व्यापारी विरोध करताना दिसत आहेत. तीन कोटी कामगारांचे काय होणार, असा सवाल केला जात आहे. मोदींच्या सोने खरेदी न करण्याच्या आवाहनानंतर सराफा बाजारात लोकांची गर्दी कमी झाली आहे. सोन्याचे भावही घसरले आहेत. या घडामोडीवर सराफा व्यापा-यांनी संताप व्यक्त करत मोदींच्या आवाहनाला विरोध केला.

आपल्या १२ वर्षांच्या अपयशाचे खापर भारतीय जनतेच्या डोक्यावर फोडू नका, असा इशारा विरोधी पक्षाने पंतप्रधानांना दिला. पंतप्रधानांचे विधान म्हणजे त्यांच्या अपयशाचा पुरावा असल्याची टीका काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केली. 'एक्स'वरील आपल्या पोस्टमध्ये ते म्हणतात, मोदीजींनी जनतेला त्याग करण्याचे आवाहन केले. सोने खरेदी करू नका, परदेश प्रवास टाळा, पेट्रोलचा वापर कमी करा, खते आणि खाद्य तेलाचा वापर कमी करा, मेट्रोने प्रवास करा आणि 'वर्क फ्रॉम होम'करा, हे केवळ सल्ले नसून सरकार आपटल्याचे पुरावे आहेत. ते पुढे म्हणतात, १२ वर्षांच्या काळात देशाला अशा टप्प्यावर आणून ठेवले आहे की, आता जनतेला काय खरेदी करावे आणि काय नाही, कुठे जावे आणि कुठे नाही हे सांगावे लागत आहे. आपली जबाबदारी झटकण्यासाठी ते वारंवार जनतेवर भार टाकत आहेत. निवडणुका संपताच सरकारला 'संकटा'ची आठवण झाली. भाजप सरकारचे अर्थव्यवस्था आणि परराष्ट्र धोरणावरील नियंत्रण सुटले आहे, अशी टीका सपाचे नेते अखिलेश यादव यांनी केली आहे. हे सरकार केवळ निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून कारभार करते, अशी कोपरखळी ठाकरे शिवसेनेच्या प्रियंका चतुर्वेदी यांनी मारली. जर इंधन वाचवायचे असेल तर पंतप्रधानांनी स्वत:चे रोड शो, जाहीर सभा आणि परदेश दौरे थांबवावेत, अशी टीका 'आप'चे संजय सिंह यांनी केली.

सामान्य जनतेकडे खायला पैसे नाहीत मग ते सोने कोठून खरेदी करणार, मोदी कोणाला सल्ला देत आहेत? असा सवाल सीपीआयचे डी. राजा यांनी केला. काँग्रेससमवेत अन्य विरोधी पक्षनेत्यांनी मोदींवर टीका केली असताना भारतीय जनता पक्षाने पंतप्रधानांच्या विधानाचा बचाव केला असून हे आवाहन व्यापक राष्ट्रहितासाठी असल्याचे म्हटले आहे. कठीण काळात काँग्रेसचे केवळ राजकारण सुरू असते. त्यांना राष्ट्रउभारणीशी काही देणे-घेणे नाही, अशी टीकाही भाजपने केली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही तीव्र शब्दांत टीका केली. जेव्हा लोक अडचणीत आहेत तेव्हा पंतप्रधान बचतीचे धडे देत आहेत. २८ फेब्रुवारीला जेव्हा पश्चिम आशियात संघर्ष सुरू झाला, तेव्हाच काँग्रेसने अर्थव्यवस्थेवरील परिणामांबाबत इशारा दिला होता. मात्र तेव्हा पंतप्रधान प्रचारात आणि 'रोड शो'मध्ये व्यस्त होते. निवडणुका संपताच आता जनतेला 'हे करू नका, ते करू नका', अशी प्रवचने ऐकवली जात आहेत, असा टोला खरगे यांनी लगावला.

सोने खरेदी न करण्याच्या आवाहनानंतर सोन्याचा भाव घसरला आहे. सध्या लग्नसराई आहे. तरीही दागिन्यांच्या दुकानात गर्दी दिसत नाही. ज्वेलरी मेकिंगवर उदरनिर्वाह असणा-या ३ कोटी कारागिरांचे काय होणार, असा सवाल ऑल इंडिया ज्वेलर्स संघटनेने केला आहे. भारतात दागिन्यांच्या घडणावळीचे काम करणारे तीन कोटी कारागीर आहेत. ते काम कोठे करणार? मुंबईत एकूण १५ हजार ज्वेलर्स आहेत, त्यांचे काय होणार? देशभक्त आम्ही पण आहोत, पण कोणाची रोजीरोटी जायला नको, असे आमचे मत आहे, असे संघटनेने म्हटले आहे. वर्षभर सोने विकले नाही तरीही सोन्याचे व्यापारी जगू शकतात, मात्र कारागिरांनी कसे जगायचे? पंतप्रधानांनी जनतेला काटकसरीचे आवाहन केले. निवडणुका संपल्याने आता जनतेसाठी महागाईचा काळ कठीण असेल. पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन करताना त्याची सुरुवात श्रीमंत आणि राजकारण्यांपासून व्हायला हवी. धनदांडगे स्वत:च्या विमानाने, गाड्यांनी फिरणार असतील तर सामान्यांनीच का विचार करावा? सोने खरेदी टाळण्याचे आवाहनही केवळ सामान्यांसाठीच का? 'वर्क फ्रॉम होम'सारखे निर्णय सरकारने आदेशाद्वारे लागू करावेत. केवळ आवाहने करून उपयोग नाही. तेल-इंधन कमी वापरा असे मोदी सांगत आहेत. त्याऐवजी त्यांनी देशात पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय करावी, अन्यथा भविष्यात 'पाणी कमी प्या' असे आवाहन करण्याची वेळ येईल. सामान्य नागरिकांनीच केवळ काटकसर करावी ही अपेक्षा चुकीची आहे. लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यांनीही सरकारी जाहिराती, भव्य स्वागत समारंभ आणि अनावश्यक दौरे टाळून आदर्श घालून दिला पाहिजे. सर्वप्रथम भाजपशासित राज्यांनी स्वत:हून काटकसर करावी मगच जनतेला आवाहन करावे, ही अपेक्षा योग्यच आहे. मोदी यांनी सलग दुस-या दिवशी वडोदरा येथे देशवासियांना इंधन जपून वापरण्याचे आवाहन केले. पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा, मेट्रो, विजेच्या बस सार्वजनिक वाहतुकीचा उपयोग करावा असे ते म्हणाले. 'वर्क फ्रॉम होम', शाळा ऑनलाईन चालवणे आदी उपाययोजना कराव्यात. कोरोनाचा मुकाबला देशाने केला. त्याचप्रमाणे भारतीयांनी सध्याच्या संकटाचा सामना करावा. परदेशात राहणा-या भारतीयांनी किमान ५ परदेशी पाहुण्यांना भारतात पर्यटनासाठी आणावे असे आवाहन त्यांनी केले. निवडणुका होईपर्यंत झोपलेल्या सरकारला आता इंधनाची आठवण झाली आहे. युध्दस्थितीवर कोणतीही प्रतिक्रिया न देता केवळ प्रचारात मग्न असणारे सत्ताधारी आता जनतेला काटकसरीचे डोस पाजत आहेत. स्वत:ला स्वच्छ म्हणवणारा भाजप सत्तेसाठी कोणत्याही थराला जातो हे जनतेने पाहिले आहे. ज्या राज्यात ताकद नाही, तिथे मित्र पक्षांचे खच्चीकरण करणे हा भाजपचा इतिहास आहे. केरळ आणि तामिळनाडूमध्ये भाजपचे अस्तित्वच नसल्याने ही राज्ये वगळता अन्य राज्यांमध्ये आपला कुटील डाव खेळून भाजपने आपली राजकीय पोळी भाजून घेतली आहे. तपास यंत्रणांचा धाक, दांभिकपणा, रेवडी बाजार, विद्वेष, दुष्प्रचार, पैशाच्या प्रलोभनाद्वारे मतदारांना विकतही घेतले गेले. सामान्य माणूस हा परिस्थितीनुसारच कोठे, किती खर्च करावा याचा अंदाज घेऊनच निर्णय घेत असतो. मग तो परदेश दौरा असो किंवा सोने-चांदी खरेदी असो. पंतप्रधानांनी जनतेला उपदेशाचे डोस पाजताना, स्वत: परदेश दौरे कमी करायला हवेत. मेट्रो, समृध्दी महामार्ग, मिसिंग लिंक, बोरिवली-ठाणे भुयारी मार्ग, लाडकी बहीण योजना यावर पाण्यासारखा पैसा खर्च करून देशाला दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे केले आहे त्याचे काय?

# मोदींचा गर्भित इशारा !

आखाती देशातील वाढता तणाव आणि जागतिक ऊर्जा संकटाची वाढती तीव्रता या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी रविवारी जनतेला संबोधित केले. या वेळी त्यांनी जनतेला ९ महत्त्वाची आवाहने केली आहेत. ज्यात प्रामुख्याने पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर, वर्क फ्रॉम होमला प्राधान्य, सोन्याची खरेदी टाळणे आणि स्थानिक (स्वदेशी) उत्पादनांचा वापर वाढवण्यावर भर दिला आहे. किमान वर्षभर नागरिकांनी सोने खरेदी करू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे. मोदींच्या या आवाहनानंतर जनतेमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. देशात पुन्हा लॉकडाऊन लागणार काय? असा प्रश्न सामान्य नागरिकाला पडला आहे. मध्य पूर्वेतील युद्धामुळे निर्माण झालेल्या जागतिक तेल संकटामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण येत आहे.

या परिस्थितीचा सामना करण्यासाठी पंतप्रधान मोदींनी देशाला उद्देशून महत्त्वपूर्ण आवाहन केले. विदेशी चलन वाचवण्यासाठी नागरिकांनी इंधनाचा वापर कमी करावा, पुन्हा 'वर्क फ्रॉम होम' संस्कृतीकडे वळावे आणि लग्नसराईत किमान एक वर्ष सोन्याची खरेदी टाळावी, असे आग्रहाचे प्रतिपादन त्यांनी केले. इराण आणि इस्रायलमधील तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमती प्रती बॅरल ७० डॉलरवरून थेट १२६ डॉलरवर पोहोचल्या आहेत. या संकटामुळे जगात पेट्रोल-डिझेल महागले आहे. पंतप्रधान म्हणाले, कोरोना काळात आपण वर्क फ्रॉम होम, ऑनलाइन मीटिंग्ज आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगची सवय लावून घेतली होती. आज देशहितासाठी या सवयी पुन्हा सुरू करण्याची गरज आहे. पेट्रोल-डिझेलवर खर्च होणारे विदेशी चलन वाचवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले. पंतप्रधानांनी केवळ इंधनावरच नव्हे तर इतर आयातीवरही भाष्य केले. किमान एक वर्ष लग्नासाठी सोन्याची खरेदी करू नका, खाद्यतेलाची आयात कमी करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाने त्याचा वापर थोडा कमी करावा, ज्यामुळे देशाची तिजोरी अणि कुटुंबाचे आरोग्य दोन्ही सुधारेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शेतक-यांनाही रासायनिक खतांचा वापर ५० टक्क्यांनी कमी करून नैसर्गिक शेतीकडे वळण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत १५ मेपूर्वी मोठी वाढ होऊ शकते. गत ४ वर्षातील ही सर्वांत मोठी दरवाढ असण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे तेल कंपन्यांना दरमहा ३० हजार कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत आहे. सध्या सरकार पेट्रोलवर प्रती लिटर २४ रुपये आणि डिझेलवर ३० रुपये भार सोसत आहे. या दरवाढीमुळे पेट्रोल-डिझेल ४-५ रुपयांनी तर गॅस सिलेंडर ४० ते ५० रुपयांनी महाग होऊ शकतो. श्रीलंका किंवा बांगलादेशप्रमाणे भारतात इंधनाचा तुटवडा भासू नये यासाठी सरकारने रशिया, अमेरिका आणि पश्चिम आफ्रिकेतून कच्च्या तेलाची आयात वाढवली आहे. रिफायनरीची क्षमताही १०० टक्क्यांहून अधिक करण्यात आली आहे मात्र जागतिक परिस्थिती पाहता आता नागरिकांनीही बचतीचा मार्ग अवलंबणे गरजेचे झाले आहे. युक्रेन आणि मध्य पूर्वेतील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. अशा कठीण परिस्थितीत देशाचा परकीय चलनसाठा सुरक्षित ठेवणे हे सरकारपुढील सर्वांत मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर मोदींनी जनतेला एक भावनिक आणि व्यावहारिक आवाहन केले आहे.

येत्या वर्षभरात देशवासीयांनी विवाह समारंभासाठी अथवा गुंतवणुकीसाठी नवीन सोने खरेदी करू नये. सोन्याच्या आयातीमुळे देशातील मोठा पैसा बाहेर जातो, जो सध्याच्या काळात रोखणे आवश्यक आहे. ऑनलाइन बैठका आणि व्हीडीओ कॉन्फरन्सगिंच्या माध्यमातून आपण वेळेची आणि इंधनाची मोठी बचत करू शकतो. मॅन्युफॅक्चरिंग आणि आरोग्य सेवा यासारख्या क्षेत्रात प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य असली तरी डिजिटल अर्थव्यवस्थेतील कोट्यवधी नोक-या घरून केल्या जाऊ शकतात. जर केंद्र आणि राज्य सरकारांनी मिळून 'ग्रीनवर्क पॉलिसी' राबवली तर भारत तेल आयातीवरील अवलंबित्व लक्षणीयरित्या कमी करू शकतो. ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा निकाल जाहीर झाल्यानंतर पंतप्रधान मोदींनी हैदराबाद येथील एका जाहीर सभेतून जनतेशी संवाद साधला. सध्या जगभरात निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती, आखाती देशातील तणावामुळे विस्कळीत झालेला कच्च्या तेलाचा पुरवठा आणि त्याचा जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम यावर पंतप्रधानांनी भाष्य केले. देशहितासाठी नागरिकांनी काही काळ संयम पाळावा, असे आवाहन करताना ते म्हणाले, इंधन आणि खाद्यतेलाचा काटकसरीने वापर करा, सुवर्ण खरेदीला स्थगिती द्या, परदेशी प्रवासावर मर्यादा घाला, वैयक्तिक वाहनांऐवजी मेट्रोसारख्या सार्वजनिक वाहतुकीचा किंवा इलेक्ट्रिक वाहनांचा जास्तीत जास्त वापर करा, डिजिटल कार्यसंस्कृतीला प्राधान्य द्या, स्वदेशीचा जागर करा, असे आवाहन केले. पंतप्रधानांच्या या आवाहनावर मुंबईतील सामान्य नोकरदार आणि कष्टकरी वर्गातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. पंतप्रधानांच्या सल्ल्यावर रोष व्यक्त करताना मुंबईकरांनी सत्ताधारी आणि लोकप्रतिनिधींच्या जीवनशैलीवर बोट ठेवले आहे. सर्वसामान्यांना उपदेश करण्यापूर्वी सरकारने स्वत:मध्ये बदल घडवून आणावा, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. एका मंत्र्यासोबत किंवा नेत्यासोबत दहा-दहा गाड्यांचा ताफा फिरतो, याकडे लक्ष वेधत जनतेने म्हटले की, केवळ छोट्या अंतराच्या प्रवासासाठीही हेलिकॉप्टरचा होणारा अवाढव्य वापर प्रथम थांबवला पाहिजे. मंत्र्यांच्या लवाजम्यावर होणारा खर्च आणि इंधनाचा अपव्यय कमी केल्यास ते आदर्शवत ठरेल. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवण्याच्या मुद्यावरही नागरिकांनी सरकारला आरसा दाखवला. मेट्रोचा प्रवास सुखकर असला तरी त्याचे तिकिट दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे नाहीत. सरकारला खरोखरच प्रदूषण आणि इंधन वापर कमी करायचा असेल तर मेट्रोचे प्रवास दर कमी केले पाहिजेत किंवा काही वर्गासाठी मेट्रो सेवा विनामूल्य केली पाहिजे. पंतप्रधान मोदींच्या आवाहनाकडे अनेक जण केवळ देशभक्तीचा किंवा भावनिक संदेश म्हणून पाहत असले तरी अर्थतज्ज्ञांच्या मते हे भारताच्या अर्थव्यवस्थेशी संबंधित एक मोठे पाऊल आहे. लोकांनी थोडे आर्थिक शहाणपणाने वागून गरजेनुसार खर्च केला तर देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्याबरोबरच सामान्य नागरिकांनाही मोठा दिलासा मिळू शकेल. महागाईवर नियंत्रण ठेवण्यात अपयश आल्यानंतर आता सरकार नागरिकांनाच काटकसरीचे धडे देत आहे, असा आरोप काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी केला आहे.

Marathi News paper 'Puneri Chalval' Editor ,Owner Sunil Balkisan Goyal Printed at Shree Samarth Printers, 483, Roshani Palace, Shop No 8, Shaniwar Peth, Dist - Pune - 411030 and Published by Varun Sunil Goyal from S. No-155,HussinShah Baba Nagar vishrantwadi Pune 411006 Editor -Sunil Balkisan Goyal

पुणेरी चळवळ हे मराठी साप्ताहिक मुद्रक, मालक, संपादक - सुनिल बालकिसन गोयल एवं प्रकाशक - वरुण सुनिल गोयलने श्री समर्थ प्रिंटर्स, ४०३ रोशनी पॅलेस, शॉप नं ८, शनिवार पेठ, जिल्हा-पुणे - ४११०३० (महाराष्ट्र) मुद्रीत कर शहर कार्यालय सं.नं.१५५, हुसेनशाह बाबानगर, प्रतिकनगर कार्यालया के बाजुमें येरवडा पुणे - ४११००६ ( महाराष्ट्र ) यहाँ प्रकाशित किया. संपादक- सुनिल बालकिसन गोयल

पुणेरी चळवळ मराठी साप्ताहिक मुद्रक, मालक, संपादक- सुनिल बालकिसन गोयल तसेच प्रकाशक - वरुण सुनिल गोयल यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, ४०३ रोशनी पॅलेस , शॉप नं ८, शनिवार पेठ, जिल्हा-पुणे - ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापुन शहर कार्यालय सं. नं. १५५, हुसेनशाह बाबानगर, प्रतिकनगर कार्यालया शेजारी येरवडा पुणे - ४११००६ ( महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक- सुनिल बालकिसन गोयल

अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या, लेख, व जाहीरात यांच्याशी मालक, संपादक सहमत असतीलच असे नाही. सदरचा वाद-विवाद पुणे न्यायलयाच्या कक्षेत

# आई-वडिलांच्या अपघाती मृत्यूनंतर मुलांना ९५ लाखांची मदत

**पुणे** - संसार सुरळीत सुरू असताना अपघातात दाम्पत्याचा मृत्यू झाला. शिक्षण घेणाऱ्या दोन्ही मुलांना शुल्क भरण्यासह दैनंदिन गरजा भागविण्यासाठी कसरत करावी लागली. त्यात वय झालेल्या आजोबा-आजींची जबाबदारी. अशा परिस्थितीत मुलांना आशेचा किरण मिळाला. दीड वर्षांपासून न्यायालयात दाखल असलेला मोटार अपघात न्यायप्राधिकरणाचा दावा निकाली निघाला.

दोघांच्या मृत्यूची मिळून ९५ लाख रुपये भरपाई मिळाली. थोरल्या मुलाने नुकतेच १८ वर्ष पूर्ण केले आहे. स्वत:सह भावाच्या शिक्षण पूर्ण करण्यासह आजी-आजोबांना सांभाळण्याची जबाबदारी त्याने घेतली आहे. या दाव्यात तडजोडीसाठी अर्जदारांचे वकील ड. जी. पी. शिंदे, ड. सतीश घरत आणि ड. मकरंद शिंदे, विमा कंपनीचे वकील पंकज मेहता व अधिकारी श्रद्धा पूर्णपात्रे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

माधव (वय ४०) आणि माधवी (वय ३६) (नावे बदलली आहेत) अशी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी दोघे दुचाकीवरून पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरून चालले होते. त्यावेळी वडगाव मावळच्या हद्दीत पाठीमागून आलेल्या जीप गाडीने दुचाकीला धडक दिली. अपघात इतका भयंकर होता की, दोघांचा जागीच मृत्यू झाला.



या अपघातात दाम्पत्याच जीव गेलाच. मात्र, कुटुंबियांचीही परवड सुरू झाली. शिक्षण घेणारी दोन्ही मुले आणि ६५ वर्षाचे आजोबा व ६२ वर्षांची आजी. कुटुंबातील जबाबदारी घेणार कोण, असा प्रश्न झाला. प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना झगडावे लागत होते. या परिस्थितीत कुटुंबियांनी नुकसान भरपाई मिळावी, यासाठी येथील मोटार अपघात न्यायप्राधिकरण येथे ड. जी. पी. शिंदे, ड. सतीश घरत आणि ड. मकरंद शिंदे यांच्यामार्फत दावा दाखल केला.

जीपचा मालक आणि विमा कंपनी असलेल्या लिबर्टी जनरल इन्शुरन्स कंपनीच्या विरोधात डिसेंबर २०२४ मध्ये हा दावा दाखल केला होता. माधव सरकारी नोकरीला होते. त्यांना दरमहा ५० हजार रुपये पगार होता. तर माधवी गृहिणी होती. मृत्यू समयीचे वय, दोघांवर असलेल्या अवलंबत्वाचा विचार करून अधिकाधिक नुकसान भरपाई देण्याची मागणी दाव्यात करण्यात आली. शनिवारी (दि. ९) झालेल्या लोकअदालतमध्ये कुटुंबियांची परिस्थिती पाहून संवेदनशील दाव्यात तडजोड करण्यास अर्जदार व विमा कंपनीने सहमती दर्शवली.

# ओव्हरहेड केबल धोरण अंतिम टप्प्यात!

■ **विद्रूपीकरण रोखण्यासाठी आयुक्तांचा 'मास्टर प्लॅन'**

**पुणे** : शहरातील ओव्हरहेड केबलच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र धोरण तयार केले असून त्याच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास सुरू असल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. 'महाप्रीत' संस्थेबरोबरही यासंदर्भात चर्चा सुरू असून धोरणाला लवकरच अंतिम स्वरूपात दिले जाईल असे त्यांनी स्पष्ट केले.

पथ विभागाने हे धोरण आयुक्तांना सादर केले होते. आयुक्तांनी त्यात काही बदल सुचविले आहेत. रस्त्यांवर लोंबकळणाऱ्या ओव्हरहेड केबलमुळे विद्रूपीकरण होत




असल्याचे तसेच अपघातांची शक्यता आहे. यामुळे महापालिकेने गेल्या काही महिन्यांपासून विनापरवाना टाकलेल्या केबल हटविण्याची कारवाई सुरू केली. या कारवाईला केबल टीव्ही आणि ब्रॉडबँड ऑपरेटर असोसिएशनने विरोध केला होता.

असोसिएशनने महापालिकेकडे स्पष्ट नियमावली, धोरण जाहीर करण्याची मागणी केली होती. कोणतीही कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना सूचना द्याव्यात, तसेच संबंधितांना विश्वासात घेऊन प्रक्रिया राबवावी, अशीही मागणी केली होती. त्यानंतर पालिकेने ओव्हरहेड केबलसंदर्भात स्वतंत्र धोरण तयार करण्याचे ठरवले.

**धोरणाचे परिणाम तपासणार**

प्रस्तावित धोरणामुळे कोणते परिणाम होतील, याचा अभ्यास करण्याचे अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत. आर्थिक, तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींचा विचार करूनच अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. शहरातील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. यामुळे महापालिकेचे कोणतेही नुकसान होणार नाही, असे आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले. या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघाल्यास शहराचे विद्रूपीकरणही कमी होणार आहे.

# काळेवाडीत पाइपमध्ये अडकल्या आजी; जवानांनी केले रेस्क्यू

**पुणे** - काळेवाडीतील पाचपीर चौक परिसरात बुधवारी दुपारी हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. रस्त्यालगतच्या पाणीपुरवठा लाइनच्या पाइपमध्ये एका वृद्ध महिलेचा पाय अडकला आणि त्या अक्षरशः दोन तास वेदनेत तडफडत राहिल्या. अखेर पिंपरी अग्निशमन दलाच्या जवानांनी राबविलेल्या शर्थीच्या बचाव मोहिमेनंतर या महिलेची सुखरूप सुटका करण्यात आली. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात जवानांचे कौतुक केले.

दुपारी १२ वाजून १ मिनिटांनी मुख्य अग्निशमन केंद्राच्या नियंत्रण कक्षाला काळेवाडी पाचपीर चौकाजवळ एका वृद्ध महिलेचा पाय पाइपमध्ये अडकल्याची माहिती मिळाली. अनिल लगोरी यांनी याबाबत अग्निशमन विभागाला माहिती दिली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर स्मिता भागवत कासारे (वय ६५) यांचा पाय पाणीपुरवठा लाइनवरील व्हॉल्व्ह ऑपरेशनसाठी असलेल्या सुमारे चार ते पाच फूट खोल पीव्हीसी पाईपमध्ये गुडघ्यापर्यंत अडकलेला असल्याचे समोर आले.

पाय आतमध्ये वळल्याने त्यांना तीव्र वेदना होत होत्या. हालचाल करणेही अशक्य झाले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अग्निशमन विभागाने अतिरिक्त मनुष्यबळ आणि अत्याधुनिक उपकरणे मागवून घेतली. पाइपच्या आसपासची जमीन काळजीपूर्वक खोदण्यात आली. बॅटरी ऑपरेटेड ग्राइंडर कटर, हायड्रॉलिक कटर, पेट्रोल इंजिन कटर आणि पोर्टेबल कटरच्या सहाय्याने बचाव कार्य सुरू करण्यात आले.

# २१ लाखांच्या बदल्यात खेळण्यातील ५० लाखांच्या नोटा

**पुणे** - विवाह विषयक संकेतस्थळावरील ओळखीतून एकाने तरुणीला २१ लाखांचा गंडा घातला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणीने पैसे मागितल्यावर खेळण्यातील नोटा असलेली पन्नास लाखांची बॅग हवाली केली. याप्रकरणी ३२ वर्षीय तरुणीने सिंहगड रोड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार गोरखनाथ गावंडकर (रा. कडसुरे, रायगड) याला अटक केली आहे.

त्याला न्यायालयाने १३ मे पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. फिर्यादीनुसार तरुणी घटस्फोटीत असून गोरखनाथशी मार्च २०२५ मध्ये विवाह विषयक संकेतस्थळाच्या माध्यमातून परिचय झाला. त्याने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून विश्वास संपादन केला. आपण आर्थिक अडचणीत असून, पैशाची गरज आहे असे सांगून वेळोवेळी २१ लाख रुपये उकळले.

काही दिवसांनंतर आपली फसवणूक होत असल्याची चाहूल लागल्यावर तिने गोरखनाथकडे पैसे मागितले. १५ फेब्रुवारी गोरखनाथ पुण्यात आला असता तरुणीला सिंहगड रोडवरील एका हॉटेलबाहेर भेटायला बोलावले. त्याने एक काळ्या रंगाची बॅग आणली होती. त्याने सांगितले बॅगेत पन्नास लाख असून तुझे २१ लाख रुपये घे, आणि राहिलेले पैसे मला आरटीजीएसद्वारे पाठवून दे. त्यानंतर गोरखनाथ तेथून निघून गेला. बॅगेला लॉक होते. त्यामुळे तरुणीने तेथे जागेवर उघडून पाहिली नाही.

# ८ हजार चौरस फुटांचे गोडाऊन खाक; ७ दुचाकींसह टेम्पो जळून भस्मसात

**पुणे** - बिबवेवाडीत अप्पर डेपोजवळ ८ हजार चौरस फुटांच्या मंडप साहित्याच्या गोडाऊनला बुधवारी (दि.१२) दुपारी भीषण आग लागली. आगीत गोडाऊनमधील सर्व साहित्य तसेच आवारातील सात दुचाकी, एक टेम्पो भस्मसात झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत बचावकार्य केले. सुदैवाने, आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बिबवेवाडीतील सर्व्हे नं. ६५८, अप्पर डेपो येथे काळे अँड सन्स हे मंडप साहित्याचे गोडाऊन आहे. दुपारी १ वाजून २३ मिनिटांच्या सुमारास अचानक गोडाऊनला आग लागली. आत कापड, कार्पेट, प्लास्टिक आणि लाकडी सजावटीचे साहित्य मोठ्या प्रमाणात असल्याने काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. आगीचे, धुराचे लोट परिसरात लांबून दिसत होते.

यामुळे परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले. आगीत गोडाऊनमधील सर्व साहित्य जळून खाक झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाची पथके तातडीने घटनास्थळी आली. दाट नागरी वस्ती आणि शेजारीच असलेल्या दुकानांमुळे आग पसरून मोठे नुकसान होण्याचा धोका होता. जवानांनी चारही बाजूंनी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळविले.

मोहिमेत ७ अग्निशमन वाहने, महापालिकेचे ११ टँकर आणि पुणे कॅन्टोन्मेंटचे एक वाहन अशा मोठ्या यंत्रणेसह ५० जवानांनी भाग घेतला. मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी विजय भिलारे, समीर शेख, सुनील नाईकनवरे व कैलास शिंदे यांनी ही आग आटोक्यात आणली. स्थानिक नागरिक, पोलीस आणि महावितरण कर्मचाऱ्यांनीही आग विझवण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

# रुग्णालयाच्या परिसरात बॉम्बसदृश्य वस्तू आढळल्याने खळबळ

**पुणे** : हडपसर भागातील एका रुग्णालयाच्या आवारात बॉम्बसदृश्य वस्तू गुरुवारी आढळून आली. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान, पुणे पोलिसांसह बीडीडीएस पथक आणि इतर यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. हा प्रकार नेमका काय आहे, याची तपासणी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात घटनेची नोंद करण्याचे काम सुरू होते. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित रुग्णालय हडपसरच्या मध्यवर्ती आणि वर्दळीच्या परिसरात आहे. रुग्णालयाच्या आवारात सायंकाळी खोक्यासारखे एक पार्सल आढळले होते. एका व्यक्तीने ते तेथे ठेवून निघून गेल्याचे सांगितले जात आहे. काही वेळानंतर हा प्रकार निदर्शनास आला. त्यानंतर बॉम्बसदृश्य वस्तू आढळल्याची माहिती परिसरात पसरताच एकच खळबळ उडाली. घटनास्थळी पोलिसांचे बीडीडीएस पथक, अग्निशमन दलाचे पथक, हडपसर पोलिस तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी धाव घेतली. संबंधित वस्तू ताब्यात घेऊन पथकाने ती मोकळ्या जागेत हलवली.

# जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाचव्या मजल्याच्या जाळीवर बसून तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**पुणे** - जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी दुपारी एक व्यक्ती आत्महत्या करण्याच्या इराद्याने पाचव्या मजल्यावरील जाळीवर चढल्याने काही काळ खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या माहितीनुसार, राम शिवाजी पाचकाळे ( ३०, रा. भोर, पुणे) यांनी राजगड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अदखलपात्र प्रकरणात दखलपात्र गुन्हा नोंद करण्याची मागणी केली होती.

मागणीसाठी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाचव्या मजल्यावरील जाळीवर बसून आंदोलन सुरू केले. यामुळे कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच बंडगार्डन पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच अग्निशमन दलाचे अधिकारीही घटनास्थळी उपस्थित होते. संबंधित प्रकरणात योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर राम पाचकाळे यांचे समाधान झाले. यानंतर आंदोलन मागे घेत ते खाली उतरले.

# पुढील ३ दिवस उष्णतेच्या लाटेचा तडाखा; 'यलो अलर्ट' जारी

**पुणे** - वाढत्या तापमानामुळे पुणे वेधशाळेने बुधवारी पुण्यासाठी उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी केला आहे. पुण्यासह धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, अकोला आणि अमरावती या १२ जिल्ह्यांसाठी हा अलर्ट आहे. या भागांमध्ये कमाल तापमान सरासरीपेक्षा लक्षणीय वाढण्याची शक्यता आहे.

मंगळवारीही पुण्यात सर्वात जास्त तापमान लोहेगावात ४३.२ अंश सेल्सियस इतके नोंदवण्यात आले. शिवाजीनगरनेही ४०.८ अंश सेल्सियसचा टप्पा पार केला. किमान तापमानात कोणतीही विशेष घट नोंदवण्यात आली न्ाही. कोरेगाव पार्कातही ४०.८ अंश सेल्सियस तापमान नोंदवण्यात आले. याशिवाय पाषाण ३८.६, मगरपट्टा ४१, एनडीए ३९.८, दौंड ४०.६, हवेली ४०.१, राजगुरूनगर ४०.२,

माळीण ३६.५, चिंचवड ३८.९, आंबेगाव३९.९, हडपसर३९.४ असे तापमान नोंदवण्यात आले. किमान पुढील काही दिवस या उन्हाची तीव्रता कायम राहणार असून निरभ्र आकाशामुळे कोणताही दिलासा मिळण्याची शक्यता नाही. तसेच राज्यात पुढील तीन दिवस तीव्र उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून पुण्यासह मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका असल्याने नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे असे आवाहन केले आहे. मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच तापमानाचा पारा सातत्याने वाढत आहे. अनेक शहरांमध्ये तापमान ४० अंश सेल्सियसच्या जवळ आले असून विदर्भ आणि मराठवाड्यात तापमान ४५ अंशाच्या जवळ पोहोचले आहे. त्यामुळे दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत असून रात्रीच्या वेळीदेखील उकाड्याचा झळा सहन करावा लागत आहेत.

# राज्यातील ९९ टक्के वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज नाही



**मुंबई :** राज्यातील छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज हा अधिभार द्यावा लागणार असल्याचे चित्र काही हितसंबंधी गटांकडून निर्माण केले जात असून ते पूर्णपणे चुकीचे आहे. राज्यामध्ये महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यापेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे त्यांना त्यांनी निर्माण केलेल्या विजेवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा, असा आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिला आहे. त्यानुसार महावितरणने संबंधित वीज ग्राहकांना हा अधिभार लागू केला आहे.

राज्यात महावितरणचे २ कोटी ३७ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. त्यापैकी ६ लाख ५७ हजार घरगुती वीज ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत. आयोगाच्या आदेशानुसार सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या एकूण घरगुती ग्राहकांपैकी १६,४१० म्हणजे केवळ २.४९ टक्के घरगुती ग्राहकांनाच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. सर्व २ कोटी ३७ लाख ग्राहकांशी तुलना केली तर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेल्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण केवळ ०.०७ टक्के आहे.

राज्यात एकूण ४ लाख ४५ हजार औद्योगिक (उच्चदाब व लघुदाब) वीज ग्राहक असून त्यापैकी केवळ ८,८९४ ग्राहकांना म्हणजे सुमारे २ टक्के ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे महावितरणच्या एकूण २३ लाख ३० हजार व्यावसायिक वीजग्राहकांपैकी १२,८३२ ग्राहकांना म्हणजे ०.५५ टक्के व्यावसायिक ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने २०१९ साली छतावरील सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या वीजग्राहकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करण्याचा निर्णय दिला होता. त्यावेळी आयोगाने छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्पांची राज्यातील एकूण क्षमता २ हजार मेगावॅट झाल्यावर हा चार्ज लागू करण्याचा आदेश दिला होता. आयोगाने २०२३ मध्ये ही मर्यादा ५ हजार मेगावॅट केली. या वर्षाच्या सुरुवातीला राज्याने ५ हजार मेगावॅटची क्षमता ओलांडल्यानंतर आयोगाने २५ मार्च २०२६ च्या वीजदर आदेशात ग्रीड सपोर्ट चार्ज निश्चित केला.

सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या ग्राहकांना १२९ कोटींचा लाभ - छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेले जे ग्राहक अतिरिक्त वीज महावितरणला देतात त्यांना त्याबद्दल लाभ मिळतो. राज्यातील ४ लाख ९० हजार वीजग्राहकांना या प्रकारे गेल्या वर्षभरात १२९ कोटी ५७ लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे. त्यामध्ये ४ लाख ७२ हजार घरगुती ग्राहकांचा समावेश आहे व त्यांना १२४ कोटी ५५ लाख रुपयांचा लाभ झाला आहे.

## पार्थ पवार यांच्या 'अमेडिया' कंपनीला मोठा दणका!

■ **२२ कोटी ४७ लाखांचे मुद्रांक शुल्क भरण्याचे आदेश**

**पुणे -** मुंढवा येथील ४० एकर सरकारी जमीन गैरव्यवहारप्रकरणी केलेल्या दस्तनोंदणीत पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने मुद्रांक शुल्क बुडविल्याबाबत सुरू असलेल्या सुनावणीत अमेडिया कंपनीचे अपिल नोंदणी महानिरिक्षक यांनी फेटाळले. नोंदणी महानिरिक्षक रविंद्र बिनवडे यांनी पुणे सहजिल्हा निबंधक यांनी दिलेला निकाल कायम ठेवला,

त्यानुसार मुद्रांक शुल्काचे चुकविलेले २१ कोटी व दस्तनोंदणी केल्यापासूनचा १ कोटी ४७ लाखांचा दंडही भरण्याचे आदेश नोंदणी महानिरिक्षक यांनी दिले आहेत. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियत्रंक यांच्या या आदेशामुळे अमेडिया कंपनीचे भागधारक पार्थ पवार आणि त्यांचे नातेवाईक तसेच भागधारक दिग्विजयसिंह पाटील यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

मुंढवा येथील बोटॅनिकल सर्वे ऑफ इंडियाच्या ताब्यात असलेली सरकारी जमीन कुलमुखत्यारधारक शीतल तेजवानी यांनी पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीचे भागधारक दिग्विजयसिंह पाटील यांना ३०० कोटी रुपयांत विकण्यात आली. या जागेवर डेटा सेंटर उभारण्यात येणार असून मुद्रांक शुल्कात सवलत मिळावी, यासाठी उद्योग विभागाने इरादा पत्र द्यावे, अशी विनंती कंपनीने केली होती.

उद्योग विभागाकडून मिळालेल्या या पत्रानुसार दस्त खरेदीवेळी मुद्रांक शुल्कात माफीची मागणी करण्यात आली. दस्त करताना सात टक्के मुद्रांक शुल्क भरणे अपेक्षित असताना कंपनीने नियमानुसार पाच टक्के मुद्रांक शुल्काची सवलत गृहीत धरून उर्वरित दोन टक्के मुद्रांक शुल्काची सहा कोटी रुपये रक्कम भरणे अपेक्षित होते.

मात्र, ही दोन टक्के मुद्रांक शुल्काची रक्कमही न भरता केवळ ५०० रुपयांच्या मुद्रांक शुल्कावर व्यवहार पूर्ण केला. मुद्रांक शुल्क बुडविल्यानंतर सहजिल्हा निबंध कार्यालयाकडून दोन टक्के मुद्रांक शुल्क अर्थात सहा कोटी रुपये भरण्याबाबत कंपनीला नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.

विभागाने आठ दिवस मुदतवाढ देऊन २४ नोव्हेंबरपर्यंत नोटीस जारी केली. त्यानंतर पुन्हा कंपनीने १५ दिवसांची मुदत वाढवून द्यावी, असा अर्ज केला. सहजिल्हा निबंधक कार्यालयाने त्यावर ४ डिसेंबरची मुदत दिली. यावेळी कंपनीकडून म्हणणे सादर करण्यात आले, त्यात मुद्रांक शुल्कात मिळवलेली सवलत ही उद्योग विभागाच्या इरादा पत्रानुसारच असल्याचा दावा वकिलांनी केला.

त्यामुळे संपूर्ण सात टक्के मुद्रांक शुल्क सवलत पात्र असल्याने अमेडिया कंपनी २१ कोटी रुपये मुद्रांक शुल्क भरणार नसल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. सहजिल्हा निबंधक यांनी डिसेंबर २०२५ मध्ये निकाल दिला, त्यानुसार कंपनीला सात टक्के मुद्रांक शुल्काचे २१ कोटी आणि २० मे २०२५ या दस्त नोंदणीच्या तारखेपासून असा १ टक्के प्रमाणे १ कोटी ४७ लाख दंड , अशी एकूण २२ कोटी ४७ लाख रुपयांची रक्कम भरण्याचे आदेश दिले होते.

## उष्णतेच्या लाटेत ६ तास वीजपुरवठा खंडित राहणार

■ **सिंहगड रस्ता परिसराला बसणार फटका**

**पुणे :** राज्यात उष्णतेची लाट तीव्र झाली असून पुण्यातही तापमानाचा पारा ४२ अंशांच्या घरात पोहोचला आहे. अशा परिस्थितीत नागरिक आधीच उकाड्याने हैराण झाले असताना महावितरणकडून दुरुस्तीच्या कामासाठी गुरुवार (दि. १४) रोजी सिंहगड रस्ता परिसरातील अनेक भागांमध्ये तब्बल सहा तास वीजपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागणार असून महावितरणच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

महापारेषण कंपनीकडून या भागातील वेगवेगळी उपकेंद्र दुरूस्तीसाठी बंद ठेवली जाणार आहेत. नांदेड सिटी येथे दुरुस्तीचे काम करण्यात येणार असून सकाळी ७ ते दुपारी १ या वेळेत हा वीजपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. विशेषतः नांदेड सिटी आणि नांदेड सिटी टाऊनशिपमधील नागरिकांना याचा मोठा फटका बसणार आहे.

**या परिसराला फटका**

महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, नांदेड सिटी टाऊनशिप परिसर प्रभावित होणार आहे. वारजे टॉवर वर्क्स, राठी बेहरे परिसर, भुजबळ टाऊनशिप, इंद्रायणी कॉलनी, हॅपी कॉलनी, खराडे पाटील सोसायटी, आनंदनगर, आरएमडी कॉलेज व स्कूल परिसर, श्रीराम सोसायटी आणि वसुधा इश्वरा या भागांतील वीजपुरवठा बंद राहणार आहे. उत्तमनगर, दांगट पाटील नगर, शिंदे पार्क, कोंढवे धावडे, रामनगर, गणपती माथा, अहिरे गाव, देशमुखवाडी आणि शिवणे परिसर प्रभावित होणार आहे. खडकवासला गाव, किरकटवाडी, कोळेवाडी, धायरी गाव, जे. पी. नगर, शिवणे गाव, धोंडे कॉर्नर तसेच आराचटी परिसरातील वीजपुरवठा बंद राहणार आहे. दामाडी एरिया, आगम मंदिर परिसर, साई मायस्टिकव्ह्यू, के. बी. डेव्हलपर्स, अमित ब्लॉसमफिल्ड सोसायटी, आंबेगाव, जांभुळवाडी रोड, दळ्ळेनगर, सनब्राईट स्कूल परिसर, लिपाणे वस्ती, जांभुळवाडी तलाव, अथेन्सिया रॉयल सोसायटी आणि तक्षशिला सोसायटी या भागांनाही वीजबंदीचा फटका बसणार आहे.

गेल्या तीन ते चार दिवसांपासून शहरात उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांना घरात कूलर, पंखे, एसी आणि पाण्याच्या मोटारींवर अवलंबून राहावे लागत आहे. अशा वेळी सकाळपासून दुपारपर्यंत वीजपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. आधीच प्रचंड उकाडा असताना नागरिकांना अशा प्रकारे वेठीस धरणे योग्य आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## मेट्रो ४१ हजार झाडे कोठे लावणार?

पुणे - महामेट्रोने ४१ हजार झाडे लावण्याचा आणि पुढील सात वर्षे त्याची देखभाल-दुरुस्ती करण्याचा निर्णय घेऊन त्याची निविदा प्रसिद्ध केली आहे. आता ही झाडे लावण्यासाठी मेट्रोकडे जागा आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्याविषयीच्या बातम्याही आल्या. आता ही झाडे कोणत्या स्वरूपाची लावणार, त्यांची उंची, वय काय, झाडे कुठे लावणार, झाडे तोडलेल्या झाडांच्या बदल्यात लावणार का, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच याचा निर्णय निविदाधारकाने घ्यायचा की मेट्रोने घ्यायचा असे प्रश्न पर्यावरणप्रेमींनी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांना पत्राद्वारे विचारले आहेत.

## पालिकेची ७१० कोटींच्या अतिरिक्त निधीसाठी केंद्राकडे मागणी

**पुणे -** शहर- उपनगरांतील पायाभूत सुविधांसाठी केंद्र सरकारच्या अर्बन चॅलेंज फंडातून पुणे महापालिकेला ७१० कोटींचा निधी मिळणार आहे. याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवल्याची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी मंगळवारी दिली. पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक आणि रस्त्यासाठी हा प्रस्ताव असून येत्या दोन दिवसांत त्यावर निर्णय अपेक्षित आहे.

राज्य सरकारने पुण्यासह अन्य काही शहरांतील प्रकल्पांसाठी ३० हजार कोटींचे प्रस्ताव पाठवले आहेत. त्यामध्ये पुण्यासह नाशिक, पिंपरी-चिंचवड यांचाही समावेश आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने तीन हजार कोटींचा प्रस्ताव सादर केला होता. पुणे महापालिकेने सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पासाठी निधीची मागणी केली होती.

या निधीतून वाघोली, मांजरी, हंडेवाडी-औताडेवाडी, शेवाळवाडी, बावधन, वडाचीवाडी आणि होळकरवाडीमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (एसटीपी) उभारण्याचे नियोजन असल्याचे भिमाले यांनी सांगितले. अमृत योजनेत सुरू असलेली ३५० कोटींची कामे सुरू राहणार आहेत.

सोमवारी केंद्राने दिलेल्या १२९० कोटींच्या निधीत आणखी ७१० कोटींच्या निधीची भर पडेल. पुढील टप्प्यात रस्ते विकासाची कामे हाती घेतली जाणार असून, त्यासाठीही अतिरिक्त निधीचा प्रस्ताव केंद्राकडे देण्यात येणार आहे. या सगळ्यांचा विचार केल्यास शहराला तीन हजार कोटींचा निधी उपलब्ध होईल, असे भिमाले यांनी स्पष्ट केले.